# घरीच बनवा क्रिस्टल मण्यांचा कंदिल

## व

## इतर वस्तु




निर्माती

**सौ. मनीषा दीपक देवळे**

शब्दांकन

डॉ. नन्दिनी धारगळकर

# मण्यांचा कंदिल व इतर वस्तु

सौ मनिषा देवळे

शब्दांकन : डॉ. नंदिनी धारगळकर

ई साहित्य प्रतिष्ठान

मण्यांचा कंदिल व इतर वस्तु (हस्तकला)

सौ मनिषा देवळे

शब्दांकन : डॉ. नंदिनी धारगळकर

nan240950@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : ७ ऑक्टोबर २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त

कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी -

घेणे आवश्यकआहे.

# मनोगत

मला विविध वस्तु बनवून पहावयाचा लहानपणापासूनचा नाद. हा वारसा माझ्या आईकडून मला मिळाला. मणी, मोती, केन्स, इतकेच काय पण अगदी सुतळी, दोरे वूल यांच्या बॅग्ज, पर्सेस, बाहुल्या बनविण्यात माझे मन अतोनात रमत असे. सुतळीची जागा पुढे मॅक्रेमने घेतली, मण्यांची जागा क्रिस्टल मण्यांनी घेतली आणि एक वेगळेच देखणेपण या वस्तूंना प्राप्त झाले.

नोकरी करत असतांनाही फावल्या वेळात मी हेच करत असे. हळुहळु माझ्या या हस्तकलेच्या वस्तूंना मैत्रिणींकडून खूप मागणी येवू लागली. वस्तु बनविण्याचा उपद्व्याप वाढला. त्या शिकण्यासाठी क्लासचीही मागणी येवू लागली. तेव्हाच मनात आले की या वस्तूंची आवड असणाऱ्यांना सदर वस्तूंची कृति व लागणारे साहित्य अशी माहिती पुस्तकरूपाने द्यावी.

या पुस्तकाचा हा छोटासा पहिला भाग सांप्रत वाचकांच्या हातात देत आहे.

असे काही भाग लिहून रसिकांना देता येतील तितक्या कृति देण्याचा माझा मानस आहे.

तुमच्या प्रतिक्रिया हीच माझी पुढील भाग लिहून तुमच्यापर्यंत पोहोचण्याची प्रेरणा ठरेल. माझा फोन नंबर व मेलचा पत्ता पुढीलप्रमाणेः

फोन – ९३२४१९१९१९

मेल – manudevale05@gmail.com

काहीही अडचण आल्यास संपर्क साधावा

सौ. मनीषा दीपक देवळे

# अर्पणपत्रिका

माझी शिवण व लोकरीच्या कलाकृतीत पारंगत असलेली आई श्रीमती शशीकला वामन भिडे हिने माझी अतोनात काळजी घेवून माझे संगोपन केले. तिच्या मातृऋणात राहणे मला आवडेल. परंतु परमेश्वराच्या दारातही आपण रिकाम्या हाताने कधी जात नाही. या मातृदेवतेस आदराचे प्रतीक म्हणून माझे हे पहिले वहिले पुस्तक अर्पण



श्रीमती शशीकला वामन भिडे

# ऋणनिर्देश

कोणतेही कार्य एकटयाने होत नाही. कार्याचे कौतुक करणारीही माणसे हवी असतात. अनेक जणांच्या शुभेच्छा व आशीर्वाद या पुस्तकाच्या कार्याला लाभले आहेत. यामागे जशी माझी आई पाठीवर थाप मारायला उभी आहे तशीच थाप माझे पति श्री. दीपक देवळे यांनी आयुष्यभर पाठीवर दिल्याने मी आज इतकी आत्मविश्वासाने उभी आहे.

लग्नानंतर लांब रहात असली तरी अजूनही मनानी जवळ असणारी माझी बहिण वर्षा सप्रे कधीही आली तरी आजही ती मी केलेल्या वस्तु पाहून मोहरून जाते.

शालिनी देवळे या सासुबाई. त्या व नणंद ज्योति वैद्य यांनी कायमच मी केलेल्या नवीन वस्तूंची अपूर्वाईने चौकशी केली व त्याबद्दल प्रोत्साहन दिले.

माझ्या मुली अमृता व अवन्ति यांच्या संक्राती व इतर सणाला मी केलेल्या वस्तूंची वाणे उपयोगी पडली आहेत. त्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावरील आनंद मला सातत्याने प्रेरणा देत गेला

प्रत्येकाचा निर्देश करणे खरे तर शक्य नाही. त्यामुळे अनुल्लेखित अशा अनेक व्यक्तींची मी शब्दशः ऋणी आहे

# अनुक्रमणिका


१. क्रिस्टल मण्यांचा कन्दिल
२. मण्यांची राखी
३. मण्या–मोत्यांची पर्स
४. मोत्यांचा कुत्रा
५. मॅक्रेमची पर्स
६. मॅक्रेमची हंडी
७. लोकरीचा सॅन्टा क्लॉज
८. कापडाचे केळीचे पान

# १. क्रिस्टल मण्यांचा कन्दिल

## प्रस्तावनाः

आता दिवाळीच्या मुहूर्तावर करण्यासाठी क्रिस्टल मण्यांचा कन्दिल सर्वप्रथम देत आहे. मध्यम आकाराच्या मण्यांचा कन्दिल म्हणजे १० इंच घेराचा १६ इंच उंचीचा असा कन्दिल त्याचे साहित्य घरी आणून केल्यास त्याची किंमत सुमारे ५०० रुपये इतकी होते. परंतु एकदा केलेला कन्दिल कायमचा होतो

## साहित्यः

- आपल्या आवडीच्या एका वा अधिक रंगाचे क्रिस्टलचे मणी ६ पाकिटे
- सहा इंचाचे ॲल्युमिनिअमचे दोन चौकोन
- नऊ इंच व्यासाची ॲल्युमिनिअमची रिंग
- तंगूस सहा रिळे



कृतिः

- पुढील आकृतीत दाखविल्याप्रमाणे पहिली ओळ ही सहा क्रिस्टलच्या रिंगने पूर्ण करणे





- पुढील ओळ दुसऱ्या रंगाने व त्यापुढील ओळ तिसऱ्या रंगाने याप्रमाणे सहा रंगांच्या दहा ओळी प्रथम पूर्ण करून घेणे. आकृतीत दाखविल्याप्रमाणे षट्कोण तयार होतो.



- असे एकूण चार षट्कोण तयार करणे.
- आकृतीत दाखविल्याप्रमाणे हे षट्कोण एकमेकांना जोडून त्यांना झिरमिळया लावण्यासाठी साध्या माळा तयार करणे
- विविध आकाराचे व रंगाचे कन्दिल पुढील फोटोंमध्ये पहावयास मिळतील






# २.मण्यांची राखी

प्रस्तावनाः

४ सेन्टीमिटर घेराची राखी जर साहित्य घरी आणून केली तर त्या राखीची किंमत सुमारे १० रुपये इतकी होते.



साहित्यः

- पांढरे लहान आकाराचे मोती
- गुलाबी रंगाचे पोतीचे मणी
- मध्ये लावण्यासाठी मोठा सोनेरी मणी
- राखी बांधण्यासाठी रंगीत दोरा

कृतिः

- प्रथम सहा मोत्यांची रिंग करणे
- त्या प्रत्येक मोत्यावर सहा सहा मोत्यांनी एक ओळ करणे
- फोटोत दाखविल्याप्रमाणे एक मोती व एक पोतीचा मणी असे आठ मणी घालून रिंग करत जाणे
- शेवटी मागील बाजूस दोरा टाचून घेणे

# ३.मण्यांची पर्स

## प्रस्तावनाः

या सात इंच लांबीच्या व सहा इंच उंचीच्या पर्सला चोवीस इंच बंद आहेत. या सुंदर पर्सची किंमत सुमारे ३०० रुपये इतकी जर पर्सचे साहित्य घरी आणून केल्यास होते.



## साहित्यः

- पांढरे मोती तीन बंच वा जुडगे – बारा माळांचा एक जुडगा होतो
- रंगीत मणी दोन पाकिटे
- तंगूस दोन मोठी रिळे
- अस्तराचे कापड, चेन इ

- कृत्रिम फूल

कृतिः

- प्रथम एक मोती, एक रंगीत मणी, पुन्हा एक मोती, एक रंगीत मणी अशा चार मण्यांची रिंग करणे
- अशा सतरा रिंग्ज करणे – ही एक ओळ झाली
- अशा तेरा ओळी करणे
- असे दोन चौकोन करून घेणे
- हे दोनही चौकोन एकमेकांना वरील बाजू सोडून तीन बाजूंना मोत्यांनी जोडणे
- अस्तर चेन इ लावल्यावर पर्सची वरील झडप जोडून ती फोटोत दाखविल्याप्रमाणे फूल लावून त्यात अडकविणे
- विविध रंगाच्या व नमून्याच्या पर्सेस पुढीलप्रमाणे





# ४.मोत्यांचा कुत्रा

## प्रस्तावनाः

सर्व मुलांना कुत्रा आवडतो. लहान आकाराचा केल्यास की–चेन म्हणूनही वापरता येतो. मोती मोठा घेतल्यास मोठा कुत्रा होतो. सहा सें.मी. रुंद व सहा सें.मी. उंच कुत्र्याचे साहित्य घरी आणून केल्यास त्याची किंमत सुमारे ५० रुपये इतकी होते.





## साहित्यः

- पाच माळा पांढरे मोती
- प्रत्येकी दहा दहा काळे व लाल मोती
- तंगूस, कापूस

## कृतिः

- चार मण्यांची एक रिंग अशा सहा रिंग्जच्या तीन ओळी करणे
- वरपर्यंत गोलाकार विणत जाऊन दोन ओळी करणे
- नंतर मानेच्या आकारासाठी पुढील फोटोची मदत घेणे



- एका बाजूस बंद करून कापूस भरून मान पूर्ण करणे
- मान पूर्ण झाल्यावर चार मण्यांच्या रिंगेने आकृतीत दिसत आहे त्याप्रमाणे शेपूट कान व तोंड पूर्ण करणे
- शेवटी पाय लावून कुत्रा पूर्ण करणे

# ५.मॅक्रेमची पर्स

प्रस्तावनाः

या तीन रंगी सुंदर पर्सला सध्या बाजारात बरीच मागणी आहे. सात इंच लांबीची व सात इंच उंचीची अशी पर्स जर पर्सचे साहित्य घरी आणून केल्यास सुमारे २५० रुपयांना पडते.



साहित्यः

- लाल मॅक्रेम एक बंडल
- काळे मॅक्रेम एक बंडल
- पांढरे वा बिस्किट रंगाचे मॅक्रेम एक बंडल
- अस्तर कापड व चेन इ

## कृतिः


पर्सचा मुख्य भाग–

- पर्सचा मुख्य भाग बनविण्यासाठी मॅक्रेमच्या बंडलाचे असे तुकडे करून घ्यावे
  - ○ लाल – १०५ इंचाचे ३२ तुकडे
  - ○ काळे – १०५ इंचाचे १६ तुकडे
  - ○ पांढरे – १०५ इंचाचे ३२ तुकडे
- पुढील आकृतीत दाखविल्याप्रमाणे हे तुकडे एकमेकांशेजारी अगदी जवळजवळ असे लावून घ्यावेत



- पुढील आकृतीत दाखविल्याप्रमाणे रुद्रगाठ मारावी व सर्व तुकडे एकमेकांना रुद्रगाठीने जोडून घ्यावेत






- पहिला व शेवटचा तुकडाही एकमेकांना रुद्रगाठीने बांधून गोलाकार निर्माण करावा.
- गोलाकाराची दुसरी ओळही रुद्रगाठीने पूर्ण करावी.
- अपेक्षित उंची पूर्ण झाल्यावर पर्सचा तळभागही रुद्रगाठीने पूर्ण करावा

पर्सचा पट्टा –

- काळा, पांढरा व लाल असे १२० इंचाचे प्रत्येकी एकेक असे तीन तुकडे कापावे.
- सैलसर अशा रुद्रगाठीने ते एकमेकांना जोडावेत
- आवडत असल्यास मणी गुंफून गाठी द्याव्यात.
- अर्धरुद्रगाठीने पट्टा पूर्ण केल्यास त्यास पीळ पडतो व तोही सुंदर दिसतो

# ६.मॅक्रेम हंडी

प्रस्तावनाः

ही दिसावयास सुंदर वस्तु शोभेसाठी कुठेही लटकविल्यास देखणी दिसते व गृहिणीचे कलाकौशल्य सिद्ध करते. मध्यम आकाराच्या हंडीचे म्हणजे ७ इंच घेराची १६ इंच उंचीची अशी हंडी जर हंडीचे साहित्य घरी आणून केल्यास त्याची किंमत सुमारे २०० रुपये इतकी होते.





साहित्यः


- आपल्या आवडीच्या कोणत्याही दोन रंगाचे मॅक्रेम जाऊ शकेल असे मणी
- दीड इंच व्यासाची एक ॲल्युमिनिअमची एक रिंग
- चार इंच व्यासाच्या ॲल्युमिनिअमच्या दोन रिंग्ज
- तीन इंच व्यासाची एक ॲल्युमिनिअमची रिंग
- सहा इंच व्यासाच्या ॲल्युमिनिअमच्या दोन रिंग्ज
- लाल मॅक्रेमचे कापलेले १५० इंच लांबीचे ३ तुकडे
- पिवळे मॅक्रेमचे कापलेले १५० इंच लांबीचे ३ तुकडे
- लाल मॅक्रेमचे कापलेले ९० इंच लांबीचे १२ तुकडे
- पिवळे मॅक्रेमचे कापलेले ९० इंच लांबीचे १२ तुकडे


कृतिः

- दीड इंचाच्या रिंगमधे १५० इंचाचे ३ लाल व ३ पिवळे तुकडे अडकविणे
- रुद्रगाठीची वीण वापरून असे सहा सहा इंचाचे तीन पट्टे करावे. आवडत असल्यास मणीही गुंफावेत.
- यानंतर चार इंचाची रिंग घालावी.
- पुन्हा रुद्रगाठी व तिरप्या वर्तुलाकार टाक्यांनी ५ ओळी विणून झाल्यावर तीन इंच व्यासाची रिंग लावावी.
- या साठी लागणारी रुद्रगाठ चित्रासहित आधी दिली आहे. तिरपा वर्तुलाकार टाका पुढे दिला आहे









- अडिच इंच विणून ६ इंच व्यासाची रिंग लावावी
- पुन्हा ५ इंच विणावे
- नंतर ६ इंच व्यासाची रिंग लावावी
- पुन्हा दीड इंच विणून ४ इंच व्यासाची रिंग लावावी
- मॅक्रेमचे दोरे बंद करावेत

# ७.लोकरीचा सॅन्टा क्लॉज

**प्रस्तावनाः**

हे सुंदर खेळणे लोकरीचे असल्याने सुरक्षित असून मुलांना आवडते. घरी विणण्याची आवड असणाऱ्यांच्याकडे कितीतरी लोकर थोडी थोडी उरते. तीही विविध रंगांची वापरली तरी चालते. १४ इंच उंच खेळणे करण्यासाठीचा सुमारे खर्च १०० रुपये इतका होतो.



साहित्यः

- ११ नंबरच्या लोकरीच्या विणावयाच्या सुया
- लाल रंगाची लोकर, पांढरी, गुलाबी रंगाची लोकर, हिरवी, काळी, चॉकलेटी रंगाची लोकर
- धुता येणारा वॉशेबल कापूस
- कृत्रिम नाक डोळे वा टिकल्या

कृतिः

खेळण्याचा मधला मुख्य भाग

- प्रथम सुईवर काळ्या लोकरीने ४० टाके घालून घेणे
- सुलट सुईने सुरुवात करून एक ओळ सुलट व एक ओळ उलट अशा
    - ८ ओळी काळ्या लोकरीने
    - ४ ओळी पांढऱ्या लोकरीने
    - १२ ओळी लाल लोकरीने
    - ४ ओळी पांढऱ्या लोकरीने
    - ४ ओळी लाल लोकरीने
    - ४ ओळी हिरव्या लोकरीने
    - १४ ओळी लाल लोकरीने विणाव्या
- यानंतर लाल लोकरीने पुढची ओळ पुढीलप्रमाणे
    - ६ सुलट + २ चा १
    - ४ सुलट + २ चा १

    - ४ सुलट + २ चा १
    - ६ सुलट – आता ३६ टाके होतील
- यानंतरची ओळ
    - ३ ओळी लाल
    - २ ओळी गुलाबी
- यानंतरची ओळ गुलाबी लोकरीने
    - ६ सुलट + १ वाढविणे
    - ४ सुलट + १ वाढविणे
    - १२ सुलट + १ वाढविणे
    - ४ सुलट + १ वाढविणे
    - ६ सुलट – आता ४० टाके होतील
- २५ ओळी गुलाबी लोकरीने कराव्या
- त्यापुढच्या ओळीस सुलट २ चा १ शेवटपर्यंत – दोरा बांधून ठेवणे

खेळण्याचे दोन हात – प्रत्येकी पुढीलप्रमाणे

- प्रथम सुईवर लाल लोकरीने १६ टाके घालून घेणे
- एक उलट व एक सुलट अशा २२ ओळी विणणे
- यानंतर पांढरी लोकर घेवून याच पद्धतीने ४ ओळी विणणे
- यानंतर गुलाबी लोकरीने ८ ओळी विणणे
- यानंतर सुलट २ चा १ या पद्धतीने शेवटपर्यंत विणणे – आता ८ टाके होतील – दोरा बांधून ठेवणे

खेळण्याचे बूट एकूण दोन

- प्रथम सुईवर काळ्या लोकरीने १० टाके घालून घेणे
    - एक उलट व एक सुलट अशा ६ ओळी विणणे
    - सातव्या ओळीच्या सुरुवातीस व ओळीच्या शेवटी १ – १ टाका वाढविणे – आता १२ टाके होतील
- त्यानंतर एक ओळ सुलट व एक ओळ उलट अशा ५ ओळी विणणे. सहाव्या ओळीच्या सुरुवातीस व शेवटी १ – १ टाका वाढविणे – आता १४ टाके होतील
- यानंतर १३ ओळी करणे. चौदाव्या ओळीच्या सुरुवातीस व शेवटी १ – १ टाका कमी करणे – आता १२ टाके होतील
- यानंतर ५ ओळी करणे. सहाव्या ओळीच्या सुरुवातीस व शेवटी १ – १ टाका कमी करणे – आता टाके बंद करणे

खेळण्याची टोपी

- प्रथम सुईवर पांढऱ्या लोकरीने ५० टाके घालून घेणे
- सुलट सुईने सुरुवात करून एक ओळ सुलट व एक ओळ उलट अशा ७ ओळी करणे
- यानंतर लाल लोकरीच्या अशाच पद्धतीने २० ओळी करणे
- यानंतर हिरव्या लोकरीने ✱ ३ सुलट २ चा १ ✱ अशी ओळ करणे
- पुढची ओळ उलट करणे
- पांढरा, लाल व हिरवा रंग वरीलप्रमाणेच क्रमाने घेवून पुढीलप्रमाणे विणावे
- ✱२ टाके सुलट २ चा १ पांढरा✱ एक ओळ उलट

- *१ सुलट २ चा १*शेवटपर्यंत लाल रंगाने – एक ओळ उलट
- शेवटची सुई – २ चा १ शेवटपर्यंत
- दोरा घेवून गाठ बांधावी

खेळण्यातल्या सॅन्टा क्लॉजची दाढी

- प्रथम सुईवर पांढऱ्या लोकरीने ३० टाके घालून घेणे
- प्रत्येक सुईला पहिला टाका बंद करावा व नंतर पूर्ण ओळ विणावी.
- शेवटचे दोन टाके राहिल्यावर टाके बंद करणे

खेळण्यातील सॅन्टा क्लॉजची सॅक

- प्रथम सुईवर चॉकलेटी लोकरीने १२ टाके घालून घेणे
- एक ओळ सुलट व एक ओळ उलट अशा ३८ ओळी करणे

सॅन्टा क्लॉजचे विविध भाग झाल्यानंतर कापूस भरून ते एकमेकांना जोडून खेळणे पूर्ण करावे

# ८.कापडाचे केळीचे पान

## प्रस्तावनाः

१७ इंच लांब व १६ इंच रुंदी असलेले हे केळीचे कापडाचे पान प्रत्येक समारंभाला उपयोगी पडणारे आहे. जर साहित्य घरी आणून हे केले तर पानाची किंमत सुमारे ६० रुपये इतकी होते.



## साहित्यः

- हिरवे कापड १/२ मीटर
- हिरवे अस्तर १/२ मीटर
- स्पंजचा तुकडा मध्ये घालण्यासाठी
- रंगविण्यासाठी रंग

कृतिः

- प्रथम फोटोत दाखविल्याप्रमाणे केळीच्या पानाच्या आकारात हिरवे कापड, स्पंज व अस्तर कापून घेणे
- खाली स्पंज, त्यावर अस्तर व वरती हिरवे कापड ठेवून मशिनवर शिवून घेणे
- अस्तर खाली व कापड वर येईल अशा पद्धतीने उलटविणे
- पानाच्या शिरा दिसतील अशा पद्धतीने मशीनच्या टीपा मारणे
- पानावर आवडीप्रमाणे रंगाने हवे ते डिझाईन रंगवावे

# आगामी आकर्षण

## पुढील भागात

१. मोत्याची की–चेन
२. मोत्याची षट्कोनी पर्स
३. लोकरीची खेळणी
४. औक्षणाचे ताट
५. विविध प्रकारची तोरणे

# लेखिकेचा परिचय



सौ. मनीषा देवळे या बॅचलर ऑफ सायन्स केमिस्ट्री असून त्यांनी फूड अॅन्ड ड्रग्ज या विषयातील पदव्युत्तर डिप्लोमा अॅनॅलिटिकल केमिस्ट्रीमध्ये केला आहे. त्यांनी दहा वर्षे साठे बिस्किट फॅक्टरीमध्ये चिफ केमिस्ट या पदाचा अनुभव घेतल्यानंतर कन्फेक्शनरीचा सर्टिफिकेट कोर्स पूर्ण केला.

आवड म्हणून त्यांनी ज्योतिषाचा प्राथमिक कोर्सदेखिल पूर्ण केला आहे. हे सर्व करत असतांना त्यांनी विविध वस्तु बनविण्याचा छंद मात्र कधीही सोडला नाही. आजच्या काळात सर्वच वस्तु विकत मिळतात. परंतु स्वतः केलेल्या वस्तूंची नजाकतच काही और असते. त्या घरी मांडल्यावर मन खरोखरीच उत्फुल्ल होते.

या बाबीचा इतर इच्छुकांनाही लाभ मिळण्यासाठी या पुस्तकाचा खटाटोप.